# शालेय विद्यार्थ्यांची होणार आरोग्य तपासणी

**पुणे** : फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या सहकार्याने मुकुल माधव फाउंडेशन (एफएमएफ) फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या सहकार्याने व बायसिकल एंजेल्स या ना-नफा तत्त्वावरील सामाजिक उपक्रमासह पुणे ते रत्नागिरी या सायक्लॉथॉनचे आयोजन केले असून, समाजातील दुर्बल घटकांना मदत करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. ८ डिसेंबर २०१५ रोजी सुरू होऊन ते १२ डिसेंबर २०१५ पर्यंत चालेल. दोन व्यावसायिक सायकलपटू या अनोख्या कार्यक्रमात उपस्थित असतील.

या पाच दिवसांच्या कार्यक्रमात अनेक कार्यक्रम होणार असून, त्यात बायसिकल एंजेल्सच्या वतीने गरजू व्यक्तींना उपजीविकेसाठी सायकलींचे वाटप करण्यात येणार आहे. फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या सहकार्याने एमएमएफ शिरवळ, उंब्रज, कोथरूड आणि पाली येथील चार जिल्हा परिषद शाळांमध्ये वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. राकेश बक्षी (बायसिकल एंजेल्सचे संस्थापक, चित्रपट निर्माते आणि 'दि डायरेक्टर्स डायरीज'चे लेखक) आणि प्रा. राम धिल्लाँ (इंग्लंडमधील प्रसिद्धी कान-नाक-घसा तज्ज्ञ) हे दोन व्यावसायिक सायकलपटू, तसेच एमएमएफची सीएसआर टीम हा प्रवास करणार आहे.

आरोग्य शिबिरामध्ये २० हून अधिक डॉक्टरांचे पथक सामील होणार आहे. मुकुल माधव फाउंडेशनच्या संनियंत्रणाखाली असलेल्या ३१७१ मुलांची यावेळी हे डॉक्टर तपासणी करणार आहेत. तसेच आरोग्य शिबिरात सहभागी होणाऱ्या प्रत्येक नवीन विद्यार्थ्यांचे नाव संनियंत्रणासाठीच्या यादीत समाविष्ट करण्यात येणार आहे आणि नंतर त्यांच्या आरोग्याबाबत त्यांचे पर्यवेक्षण करण्यात येईल. या उपक्रमामागची संकल्पना स्पष्ट करताना एमएमएफच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया म्हणाल्या, सायक्लोथॉन हा उपक्रम आता आमच्या कॅलेंडरचा भाग बनला आहे. गेल्या वर्षी सायक्लोथॉन २०१४ मध्ये २३१३ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी झाली होती. फाउंडेशनने जि. प. भागांमधील २७ विद्यार्थ्यांना चष्मे वितरित केले.